## प्रकरण दुसरे

# ‘अक्करमाशी’ आणि ‘कोल्हाट्याचं पोरं’ या दलित आत्मकथनांचा परिचय

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# <u>प्रकरण दुसरे</u>

## 'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' या दलित आत्मकथनांचा परिचय

शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' ही दोन दलित आत्मकथने मराठी साहित्य विश्वात बरीच गाजली. ती त्यांच्या वैशिष्ट्यामुळे या दोन्ही आत्मकथनात समाजाने मानलेल्या अनैतिकतेतून जन्माला आलेल्या लेखकांचा जीवनसंघर्ष आहे.

**<u>'अक्करमाशी' लेखक परिचय :-</u>**

'अक्करमाशी' या दलित आत्मकथनाचे लेखक शरणकुमार हे अस्पृश्यतेचा अंत करणारे व माणूस घडविणारे वादळ म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या विचारांनी प्रेरित होऊन आत्मभान आलेले सुशिक्षित तरूण आहेत.

शरणकुमार लिंबाळे यांचे बालपण, वास्तव जीवन विस्तवापेक्षा दाहक असल्याने त्यांना जनमासामन्य लोकांपासून बाजूला राहता आले नाही. आयुष्यभर व्यथा, वेदना, दु:ख, दारिद्र्य यांच्या जीवनात आलेच त्याहीपेक्षा आई महार व वडील लिंगायत अशा भिन्न जातीच्या आईवडिलांच्या पोटी जन्म घेतल्याने शेवटपर्यंत 'अक्करमाशी' ही समाजाने दिलेल्या लांच्छनास्पद शिवीनेच शरणकुमार लिंबाळे ओळखले गेले.

वजनपद्धतीत तोळ्याचा बारावा भाग म्हणजे एक मासा म्हणजेच सर्वात कमी या अर्थाने सामाजिक किंमत मोजताना 'अक्करमाशी' म्हणजे सर्वात कनिष्ठ आईवडिलांच्या आईवडिलांच्या जातीभिन्नतेतून जन्माला आलेले बालक म्हणजे 'अक्करमाशा' होय. दलितांनी दलितांची केलेली हेटाळणी होय.

लेखक शरणकुमार लिंबाळे यांचे १ ली ते १० वीचे शिक्षण त्यांच्या 'हन्नूर' या गावात झाले. कॉलेजचे शिक्षण सोलापूर येथे दयानंद कॉलेजला झाले. (पृष्ठ ९१) एम.ए.चे शिक्षण घेता आले नाही. पोस्टातील टेलिफोन ऑपरेटर म्हणून त्यांनी अहमदपूर येथे नोकरी केली.

शरणकुमार लिंबाळे यांनी अनेक वेदनामयी समस्यांना तोंड देत बी.ए. पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर पोस्टातील तारखात्यात नोकरी केली. याचीच साक्ष म्हणजे

त्यांचा प्रसिद्ध झालेला 'उत्पात' हा काव्यसंग्रह होय. हा काव्यसंग्रह (१९८२), 'श्वेतपत्रिका' (२००८), 'उद्रेक' (२००८) मध्ये प्रकाशित झालेली पुस्तके आहेत. त्याशिवाय शरणकुमार लिंबाळे यांनी कथासाहित्यात देखील मौलिक भर टाकलेली दिसते. त्यांच्या कथा 'बारामाशी' (१९८८), 'हरिजन' (१९८८), 'रथयात्रा' (१९९३), 'दलित ब्राह्मण' (२००४), तर कादंबरीचा विचार केल्यास त्यातही उल्लेखनीय सहभाग असलेला दिसतो. 'भिन्नलिंगी' (१९९१), 'उचल्या' (१९९८), 'हिंदू' (२००३), 'बहुजन' (२००६), 'झुंड' (२००८) आणि आत्मनिवेदन संपादने, समीक्षा अशा वेगवेगळ्या स्वरूपाचे लेखन करून मराठी दलित साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान केलेले आहे.

**अ) १) <u>शरदकुमार हणमंता लिंबाळे</u> :-**

"अक्करमाशी" या आत्मकथनात आलेले संक्षिप्त चरित्र महार समाजातील संतामायच्या पोटी मसामायचा जन्म झाला. इठ्ठल कांबळेशी तिचे लग्न झाले. तिला भानुदास, सूर्या व धर्मा अशी तीन मुले झाली. इठ्ठल कांबळे हणमंता कांबळे या जमिनदाराकडे सालगडी म्हणून काम करीत होता. रूपवान मसामायच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिची मुले स्वत:कडे ठेवून इठ्ठल कांबळेने तिला सोडून दिले. त्यानंतर हणंता लिंबाळेने तिला अक्कलकोट येथे भाड्याच्या घरात ठेवले. तिला हणमंता लिंबाळेपासून जो मुलगा झाला तोच शरणकुमार लिंबाळे. त्याला बाप म्हणून आपले नाव लागले तर कुळाची बदनामी होईल. मोठा झाल्यावर तो इस्टेटीचा दावेदार होईल. हे हणमंतास नको होते. म्हणून त्योन मसामायशी भांडणतंटा करून व संशय घेऊन तिला सोडून दिले. त्यांनतर त्याने हन्नूरच्या यशवंत सिद्रामप्पा पाटील यांच्यापासून मसामायला नागूबाई, निर्मला, वनमाला, सुनंदा, प्रमिला, इंदिरा, श्रीकांत व सिद्राम अशी आठ मुले झाली. मात्र शरणकुमार लिंबाळे आपल्या आजीकडेच लहानाचा मोठा झाला. आजी-आईकडून मिळालेली महार जात आणि बापाकडून असलेली हिंदू-लिंगायत जात अशा जातियतेत लेखकाचे व्यक्तिमत्त्व दुभंगलेले राहिले. महार वस्तीतच रहात असल्याने अस्पृश्य म्हणून सारे उपेक्षित जीवनाचे भोग नशिबी आले. दारिद्र्य, उपासमार, अवहेलना, अस्वच्छता, उपेक्षा सर्व काही आले.

तल्लख बुद्धीच्या मुलाने दारिद्र्यात शिक्षण घेतले. धर्म-जात, जन्म-वारसा,

स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत अशा द्वंद्वाचा लेखकाच्या मनात सतत संघर्ष होत राहिला. आर्थिक अडचणीमुळे व आजी-आजोबांच्या वृद्धत्वामुळे एम.ए. न करता लेखकाने टेलिफोन ऑपरेटरची नोकरी स्वीकारली. लग्नापसाठीही लेखकाला असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागले. 'अक्करमाशी' म्हणून लग्नाला अडथळे, प्रतिष्ठित समाजात वावरण्यास 'अस्पृश्य' म्हणून जात आडवी. जगण्यासाठी, लग्नासाठी, व्यवहारासाठी लेखकाला स्वत:चा वारसा, जात लपवावी लागली. सततच्या संघर्षात आंबेडकरांच्या संदेशातून प्रेरणा घेत लेखक झुंजत राहिला. दलित चळवळ त्यांना महायुद्ध वाटते. दलित साहित्य त्यांना महाकाव्य वाटते. काव्यात्म भाषाशैली तिही महारी बोलीत वापरून ''अक्करमाशी'' आत्मकथनातून त्यांनी आपल्या जगण्याची कैफियत मांडलेली आहे.

## २) आशय अभिव्यक्तीच्या अनुषंगाने 'अक्करमाशी' या दलित आत्मकथनाचा परिचय :-

शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन १९८४ मध्ये दिलीपराज प्रकाशन (पुणे) कडून प्रसिद्ध झाले. मराठी संस्कृतीतील शिवीसदृश्य शीर्षकाच्या या आत्मकथनाने बरीच खळबळ उडवून दिली. अनेक साहित्य पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या आत्मकथनाचा नायकच 'अक्करमाशी' म्हणून हिनवला गेला आणि अक्कमाशी म्हणूनच लहानाचा मोठा झाला. आई-वडिलांच्या विवाहाविना झालेल्या संबंधातून निर्माण झालेल्या अपत्यास 'अक्करमाशी' म्हणजेच अनैतिकतेतून पैदास झालेले असा विशेषणात्मक कलंक लेखकाच्या माथी बसला. लेखकाच्या हरतऱ्हेच्या दु:खास त्याचा जन्म हे मूलभूत कारण ठरले.

'अक्करमाशी' आत्मकथनास महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला. या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीचे हच-क्रॉस ॲवॉर्ड २००४ साठी नामांकन झाले. हिंदी व कन्नडमध्ये नाट्य रूपांतर झाले. भारतीय प्रमुख भाषांमधून या आत्मकथनाचे भाषांतर झाले आहे. या आत्मकथनावर दिग्दर्शक मिलिंद डके यांनी फिचर फिल्म केलेली आहे.

शरणकुमार लिंबाळे यांची आई महार समाजातील. नाव मसामाय. वडील लिंगायत पाटील - हणमंता लिंबाळे. आईचे लग्न इठ्ठल कांबळे याच्याशी. त्याच्यापासून दोन मुले, हणमंता लिंबाळे याच्यापासून (लेखक) शरणकुमार आणि

यशवंत पाटलापासून सहा मुली व दोन मुलगे या सर्व मुलांची कागदोपत्री जात 'हिंदू-लिंगायत' पण कोणी लिंगायत त्यांना शिवून घेत नाही. जातीत घेत नाही. लेखक याला 'हा एक समांतर महारवाडा' असे म्हणतो.

अनैतिक संबंधातून जन्मला म्हणून, ठेवलेल्या बाईचा मुलगा म्हणून, महार आईच्या पोटचा म्हणून, बापाचा कसलाच आधार नाही म्हणून, दरिद्री म्हणून शरणकुमार लिंबाळेस अपमान, उपेक्षा, उपासमार, दारिद्र्य आणि एकाकीपणाला तांड द्यावे लागले.

'अक्करमाशी' आत्मकथन लिहिण्यामागील आपली भूमिका व्यक्त करताना लेखक म्हणतो, ''प्रत्येक गावात पाटील जमीनदार असतात. त्यांची रांड असते. त्या रांडेच्या मुलांच्या व्यथा लोकांना कळल्या पाहिजेत. हे सांगण्यासाठी मला आत्मकथाच जवळची वाटते.''

बहिष्कृत समाजाचे साहित्य १९६० पूर्वी लिहिले जात नव्हते. दलित साहित्याच्या निर्मितीने बहिष्कृत समाजातील सुशिक्षित तरूणांना प्रेरणा मिळाल्या. ''पुढच्या काळात बहिष्कृत समाजातील अनेक आत्मकथा साहित्यात येतील आणि तमाम भारतीय साहित्याचा चेहरा-मोहरा बदलून जाईल.'' (प्रस्तावना) असे शरणकुमार लिंबाळे यांनी म्हटले आहे. महार समाजाच्या पार्श्वभूमीतच शरणकुमार वाढले. त्यांचे अनुभवविश्व तेथेच समृद्ध झाले. त्यांनी घेतलेली वैविध्यरूपी व वैचित्रपूर्ण अनुभूती त्यांनी स्वतःच्या वैचारिक घुसमटीसहित आत्मकथनात व्यक्त केली आहे.

दलित आत्मकथने लेखकांनी आपल्या तारूण्यातच लिहिल्या आहेत. आरंभीच्या आयुष्यातील विलक्षण व दाहक अनुभव विस्मृतीत जाऊ नयेत आणि आपल्या वैचारिक प्रतिक्रिया समाजाला प्रभावीपणे समजाव्यात यासाठी हे लेखन असते. त्याचबरोबर समाजकारणाचे राजकारणाचे वास्तवचित्रणही त्यात येते. समाजजीवनाचे महत्त्वपूर्ण संदर्भसाहित्य किंवा दस्तऐवज म्हणून अशा लेखनाचे महत्त्व असते. ''मराठी आत्मचरित्रापेक्षा दलित आत्मचरित्रातले वास्तव व जीवन माणसाला आयुष्यातून उठवणारं आहे. चांगल्या प्रसंगासाठी खरी नावं सांगता येतात पण वाईट प्रसंगी हे शक्य नसतं.'' (प्रस्तावना) याचे भान ठेवून दलित साहित्यिक विशेषतः स्त्रीचित्रण करताना त्यांची नावे काल्पनिक लिहितात.

दलित शोषित पण त्यांच्यातील स्त्रिया शोषितांच्या शोषित आणि प्रस्थापित समाजातील पुरूषप्रधान संस्कृतीतील स्त्रियाही शोषितच त्यामुळे शोषितांच्या वास्तव विश्वाचा परिघ दलित आत्मकथनात फार मोठा होतो आणि त्यातील स्त्रीजीवन लक्षवेधक व विदारक असल्याने वाचकास चिंतनप्रवर्तक ठरते.

'अक्करमाशी' आत्मकथनाचा विद्यापीठीय संशोधनात आणि अभ्यासक्रमात समावेश झाला. आतापर्यंत या आत्मकथनाच्या पाच आवृत्या निघाल्या. कारूण्यपूर्ण, भावना उद्दिपित करणारे, विचार प्रवर्तक आणि मानवी जीवनावर सहज भाष्य करणारे हे लेखन असल्यामुळे या आत्मकथनाचे स्वरूप वास्तवापेक्षा कवितेच्या पातळीवर जास्त जाते.

'अक्करमाशी' म्हणून जगणे - खाणे, राहणे, बोलणे, शिकणे, लग्न करणे इ. दैनंदिन नित्य व्यवहारापासून अगदी मुलांच्या लग्नापर्यंत संघर्ष करून स्वतःचे माणूसपण घायाळ-जखमी होण्याच्या वेदना शरणकुमार लिंबाळे यांनी घटना-प्रसंग-व्यक्ती-वातावरणासहित साजिवंत केले आहे. हे लेखन प्रमाण मराठीत असले तरी संवाद महारी बोलीत आहेत. त्यामुळे आकलन सुलभता आणि वास्तवाचा जिवंतपणा या लेखनास लाभला आहे.

लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी लिहिलेले 'अक्करमाशी' हे आत्मनिवेदन अथवा आत्मकथन म्हणजे दुभंगलेल्या, व्याकूळ मनाची करूण कहाणी आहे असे म्हणणे योग्य ठरते. तसेच 'अक्करमाशी' म्हणून दरिद्री जीवन जगताना भोगलेल्या भोगांची कहाणी म्हणजे 'अक्करमाशी' हे शरणकुमार लिंबाळे यांचे आत्मकथन होय.

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची कवाडे सर्वांसाठी मोकळी झाली आणि समाजाच्या खालच्या स्तरातील लोकांपर्यंत ज्ञानाची गंगा पोहचली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वसा लाभलेले अनेक दलित तरूण निर्माण होऊ लागले. शरणकुमार हे यापैकीच एक व्यक्तिमत्त्व आहे. कोणताही जागृत झालेला दलित तरूण मूकपणाने, आंधळ्यापणाने, परंपरेने आलेले वास्तव जीवन स्वीकारत नाही. त्यास स्वत्वाची जाणीव झालेली असते.

याच जाणिवेने प्रत्ययकारी चित्रण 'अक्करमाशी' या आत्मकथनात आलेले आहे. एका दृष्टिकोनातून विचार केला तर शरणकुमार लिंबाळे यांच्या कथनामधील

जीवनानुभव अन्य लोकांपेक्षा वेगळे आहेत. एका रांडेच्यापोटी जन्माला आलेले पोर म्हणून लेखकाच्या वाट्याला आलेली फरफट निराळी आहे. या निराळेपणापासून पाझरणारे आतल्या आत धुमसत राहणारे दु:ख या आत्मकथनांच्या तळाशी आहे. प्रत्येक गावात पाटील जमीनदार असतात. त्यांनी आपल्या वासना शमनासाठी वापर केलेल्या स्त्रीला 'रांड' हे शिवीवाचक विशेषण असते. हिच्या मुलांच्या व्यथा लोकांना कळल्या पाहिजेत. हे सांगण्यासाठी मला आत्मकथाच जवळची वाटते.[१] या आत्मकथनाच्या मागील लेखनाची भूमिका लेखकाच्या या मनोगतात स्पष्ट होते.

उल्लेखनीय बाब अशी स्वकथने लिहिणारी मंडळी सामान्यत: वयोमानाने ४० ते ४५ च्या आतील आहेत. तर 'अक्करमाशी' चे लेखक शरणकुमार लिंबाळे केवळ तिशीच्या आतील आहेत. अल्पायुष्यातील दाहक अनुभवांनी पोळलेल्या या लेखकाला सभोवतालचे जग व सर्वसामान्य परिस्थिती महत्त्वाची वाटली नि 'अक्करमाशी' ची निर्मिती झाली.

शरणकुमार लिंबाळे यांनी वर्षानुवर्षे दडपलेल्या भावना 'अक्करमाशी' तून रेखाटल्या. त्यांनी जे भोगलं जे पाहिलं ते मांडलं. त्याबरोबर समाजाचे प्रबोधन व परिवर्तन व्हावे ही सुप्त इच्छा या लेखनामागे आहे.

या समाजातील बदमाश पुरूषाच्या व्यभिचाराच्या समर्थनासाठी त्याला त्याची सत्ता संपत्ती, संस्कृती आणि धर्माची पाठराखण असते. पण स्त्रीचे काय होते ? तिला तो बलात्कार पोटात वाढवावा लागतो. "त्या बलात्काराला जन्म द्यावा लागतो. त्या बलात्काराचं पालनपोषण करावं लागतं आणि हा बलात्कार एक आयुष्य जगतो. या आयुष्याच्या वेदना, दु:ख या आत्मकथनात आहेत."[२] असे लेखक शरणकुमार लिंबाळे स्वत:च म्ळणतात. लेखकाच्या विद्रोहाचा उद्रेकच या मनोगतातून व्यक्त होतो.

"इथल्या जातीय व्यवस्थेवर आधारलेल्या समाजरचनेत जन्मास येणाऱ्या प्रत्येक मानवाला त्याची अशी कुठली ना कुठली तरी जात असते. त्या कवचाखाली त्याची सारी सुख-दु:ख बंद करून ठेवलेली असतात किंवा त्याचे सगळेच जीवन बंदिवान बनलेले असते. साहजिकच विषमता संपवण्यासाठी धर्मच झुगारून देणाऱ्या समाजरचनेची गरज 'अक्करमाशी' सारख्या आत्मकथनातून निर्माण होते."

अस्पृश्यता, दारिद्र्य, शोषण आणि अवहेलना ही त्याचीही व्यथा आहे. पण उपेक्षितांनीही उपेक्षा केल्याने शरणकुमार लिंबाळे यांच्या वेदनेला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. धर्मावर आधारलेली जातीय पद्धती वर्णभेद यामधून दलितांची दु:ख निर्मिती झाली. परंतु ज्या कारणामुळे हजारो वर्षापासून या पिढ्यान् पिढया भोगलेल्या दु:खाला ज्यांनी झुगारले त्यांनीही आपला अवमान करावा याचे दु:ख लेखकाला अधिक वाटते. केवळ माणूस म्हणून जगण्यासाठी शरणकुमार लिंबाळे यांनी केलेले अव्याहत परिश्रम 'अक्करमाशी' या आत्मकथनातून दिसून येते. दलिताहून दलित, उपेक्षिताहून उपेक्षित आणि अव्हेरलेले जीणे 'अक्करमाशी' मध्ये शब्दबद्ध झाले आहे.

'अक्करमाशी' या आत्मकथनातला जीवनपटच वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसून येते. 'अक्करमाशी' म्हणजे स्वत:चे बेळगाव-महाराष्ट्र यांच्या सीमा भागातील उपेक्षित वास्तव जीवन शरणकुमार लिंबाळे यांनी केलेले वर्णन आहे. स्वत: लेखक म्हणतात - ''सत्तावीस वर्षाच्या आयुष्यातील घटना, प्रसंग आणि अनुभव मी पेरलेले आहेत. काही उगवले, काही माजले, काही गाजर गवतही उगवले असेल. शेतात केवळ पीकच येत नाही. पीकाबरोबर गवत येणारच. ही कथा माझी व्यथा आईची, आत्मकथा एका समाजाची, अक्करमाशी जितके माझे खाजगी आयुष्य आहे तितकेच ते वेदनांचं जनरल वॉर्ड आहे.''

'अक्करमाशी' म्हणजे दुभंगलेल्या मनाची कहाणी आहे. सोशिक मनाची मसामाय मनस्वी वाटते. तर तिला सहानुभूतीने आधार देणारी संतामाय स्वत:च्या दु:खाला गोंजारत न बसता सर्व नातेवाईकांना आपुलकीने जवळ घेतले. हीच माणसे एका शापिताप्रमाणे जगताना देखील आपले अदृश्य धाग्याने बांधलेले जीवन एकत्रपणे जगतात. तसेच 'अक्करमाशी' हे आत्मकथन म्हणजे सामाजिक जीवनात अस्पृश्यतेचे कुरूप दर्शन होय. कारण 'अक्करमाशी' समजून इतर महारांना 'बारमाशी' मानणाऱ्या महारांना आपल्यापेक्षा वेगळे मानतात. महारवाड्यात राहून देखील महारवाडा आपला नाही असे राहतात. शिवाय इतर जातीचे लोकही जातीयता पाळायचे परंतु महारमांगातही प्रकर्षाने पाळली जायची. याच कारणाने नदीवर सर्वांच्या खाली दलित लोकांचा पाणवठा होता. तसेच्या मांगाच्या भिम्याला पाणी देणार एवढ्यात लेखकाची आजी संतामाय ओरडते -



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

"अरे मांगाच्या नादी का लागलाय ? गाव जळालाय का खेळाय ? त्याला तांब्या देऊ नको. बाटवशील दूर व्हा."[३] (पृष्ठ १६)

एकंदर पाहता अक्करमाशीमधील संघर्ष दोन पातळ्यांवर संघर्ष चालताना दिसतो. एका बाजूने लेखक आणि त्यांच्या समाजाला जातीअंतर्गत संघर्ष करावयाचा आहे तर दुसऱ्या बाजूने सामाजिक व्यवस्थेविरूद्ध त्यांना लढा द्यायचा आहे. त्या संघर्षाचा अंत झालेला नाही तर आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांचा संघर्ष सुरूच आहे. हे सांगताना लेखक शरणकुमार लिंबाळे म्हणतात, "आमचे डोळे बांधलेले आहेत. आम्ही भरकटत आहोत. धृतराष्ट्र-गांधारीसारखे, कर्ण-कुंतीसारखे, एकलव्य-अश्वत्थाम्यासारखे रणांगणावर वडील, काका, बहिण, भाऊ, आई कळत असूनही आम्ही लढत आहोत. आमच्याशीच शत्रू समजून कारण आमच्यातील सर्व सूत्रे नीतीच्या हातात आहेत. आम्ही हारलेले आहोत. एका पराभवासाठी." (पृष्ठ ७५) या समाजाच्या प्रधान संस्कृती प्रवाहावर प्रभाव असलेल्या महाकाव्यातील संदर्भ आपल्या वाट्याला आलेल्या जीवनभोगाप्रमाणे हा दलित समाजही घेत असतो असे या निवेदनावरून दिसून येते.

ज्याप्रमाणे सोशिक माय आहे. त्याप्रमाणे महारवाडा, मांगवाडा त्यातून ओसंडणारे दारिद्र्य, घाणेरडेपणा, अज्ञान, भांडणे, अंधश्रद्धेतून आलेले देवभोळेपण, लाचारी आणि क्रौर्य यांचे चित्रण यापूर्वीही मराठी दलित साहित्यातून आले आहे. परंतु शरणकुमार लिंबाळे आणि त्यांच्या भोवतीच्या नातेवाईकांचे, माणसांचे दिशाहीन आयुष्य, भरकटत जाणारे 'तारूण्य' या आत्मकथेत वाचकाला अंतर्मुख करतात. कारण ही आत्मकथा सकृतदर्शनी जरी शरणकुमार लिंबाळे यांची असली तरी ती प्रामुख्याने मसामायचीही आहे.[४]

अक्करमाशींना महार आपले समजत नाहीत आणि ज्या तथाकथित प्रतिष्ठितापासून ही संतती जन्मली त्यांनीही नाकारलेले आहे. एक प्रकारे लक्ष्मण मानेंच्या 'उपरेपणा'पेक्षाही घृणास्पद जीवन लिंबाळेंच्या वाट्याला आलेले दिसते.

या उपेक्षित व उपऱ्या जीवनाचे सत्याला स्मरून लिहिलेले व सामाजिक भान असलेले चित्रण लिंबाळेनी केले आहे. प्रवाही आणि क्वचित संयमालाही ओलांडणारे पण तरीही वाचकांच्या क्षमाशीलवृत्तीला अवाहन करणारे सरळसोट

असे हे अक्करमाशीतील चित्रण आहे. तसेच नटसम्राटाच्या स्वगताप्रमाणे नाट्यपूर्ण स्वगत-आत्मनिवेदन स्वरूपाचे वाटते.

अक्करमाशीमधील शरणकुमार लिंबाळे यांनी व्यक्त केलेले दु:ख वास्तवातून निर्माण झालेले आहे. ते झटकून टाकण्यासारखे नाही. त्या दु:खाची तीव्रता टोकदारपणे जाणवावा एवढे ते खरे समर्थ लेखकन 'अक्करमाशी' या आत्मकथनाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गीयांना एकत्र येवून शिक्षण घ्यायला व संघर्ष करायला सांगितले. वस्तुत: अठरापगड जातीजमातींचा देशभर विस्कटलेला हा समाज या समाजात श्रेष्ठकनिष्ठतेचे असंख्य स्तर आणि अनेक मापदंड आहेत. उच्चवर्णीयांमध्ये 'शेर-सव्वाशेर-पावशेर' असे मापदंड आहेत. म्हणून 'शेरास सव्वाशेर' यासारख्या म्हणी आहेत. महार समाजाला बारामाशी म्हणजे समाजात तोळाभर नगण्य वजन. त्यात ज्याच्या आईबापाचा विवाह झालेला नसताना जन्म होतो तो 'अक्करमाशी' ठरतो. तो नगण्यातील नगण्य ठरतो. अशा 'अक्करमाशी' व्यक्तीचे आत्मकथन इतरांपेक्षा वेगळे लक्षवेधी असणारच. कारण त्या माणसाच्या जन्मापासूनच त्याच्या माणूसपणाची उपेक्षा होते.

भावनांची चिरफाड होते, विचारांची धूळधाण होते. ज्याचा माणूस म्हणून समाजातील दर (भाव) नगण्य अशा वजनरहिताने होतो. लेखकाने आपले माणूसपण सिद्ध करण्यासाठी काय भोगले ? आई-बापाचे स्थान, कुटुंबाचे स्थान, त्यांची जगण्याची रीत आणि समजाने त्यांना जगणे हराम करून टाकण्याची रीत हीच या 'अक्करमाशी' व्यक्तीची माणूसपणाची व जगण्याची पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीवर लेखकाचा जन्मापासून तीस वर्षापर्यंतचा प्रवास हा फार मोठे दु:खमय कष्टप्रद आयुष्य लाभूनही जे अनुभवता येत नाहीव ऐकायलाही मिळत नाही. ते अमानुष व सुन्न करणारे भोग तीशीतच जगल्या-भोगल्यामुळे ते विलक्षण जीवन या आत्मकथनात साकाळून आले आहे.

**ब) १) <u>किशोर शांताबाई काळे</u>**

'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनात आलेले संक्षिप्त चरित्र. साळी समाजातील महादेव व लक्ष्मी हे पतीपत्नी यांना ताराबाई (जिजी) व गंगाराम

अशी दोन मुले होती. मोलमजुरी करून हे सर्वजण एकत्र कुटुंबात रहात होते. गंगाराम वेडसर होता. महादेव भोळा होता. कुटुंबातील इतर लोक लक्ष्मी-महादेवला खूप त्रास देत. एक दिवस महादेव घर सोडून परागंदा झाला. वर्षाहून अधिक काळ लोटला. तो परत आला नाही. त्याचा शोध घेण्यासाठी लक्ष्मी आपल्या दोन मुलांना घेऊन करमाळा येथे आली. तेथे शहरभर भटकून शोध घेतला पण महादेवचा तपास लागला नाही; पण उपासमारीने माय-लेकरे व्याकूळ झाली. स्टँडवर बसलेल्या या माय-लेकरांना कृष्णा कोल्हाट्याने पाहिले. त्यांची विचारपूस केली. लक्ष्मीचे तारूण्य व भोळेपण हेरले. त्या तिघांना हॉटेलमध्ये जेऊ घातले आणि त्यांना आपल्या कुटुंबात आणले. कृष्णा कोल्हाट्यास बायको होती. कोंडीबा नावाचा मुलगा होता. त्याने लक्ष्मीच्या ताराबाईस (जिजी) कोल्हाटी रिवाजाने नाचकाम शिकविले. गंगारामास ढोलकी वाजविण्यास शिकविले आणि त्यांच्या खेळावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालू झाला.

नेरले येथील माधवराव पाटील यांनी जिजीचे तारूण्य व नाचकाम पाहून कृष्णा कोल्हाट्यास सांगितले की, ''जिजीचे गावोगाव नाचकाम करून पोट भरणे बंद करा. माझ्या वाड्यावर तिला राहू द्या.'' कृष्णा कोल्हाट्याने ते मान्य केले. माधवराव पाटलाने जिजीच्या नावावर पंचवीस एकर जमिन दिली आणि कोंडिबास सहा खणी वाडा बांधून दिला. कोंडिबाला कष्ट करायची सवय नव्हती. शेतावर गंगाराम राबत असे. त्याला फेफरे येत असे. एकदा फेफरे आल्यावर तो पाण्यात बुडून मेला. जिजीला माधवराव पाटलापासून मुलगी झाली. ती लहान असतानाच मरण पावली. कोंडिबाचे लग्न झाले. त्याला शांता, शालन, सुशीला, रंभा, बेबी अशा पाच मुली आणि पोपट, राजू व अंकुश असे तीन मुलगे झाले. कालांतराने कृष्णा कोल्हाटी, त्याची बायको रमा आणि लक्ष्मी मरण पावले. जिजीच्या शेतीच्या उत्पन्नावर माधवराव पाटलाने बांधून दिलेल्या वाड्यावर कोंडिबाचे मोठे कुटुंब राहू लागले. माधवरावाचा अकाली मृत्यू झाला आणि जिजीला कोंडिबाच्या हुकूमात पुढील आयुष्य काढावे लागले. कोंडिबाची मोठी मुलगी शांता सातवी शिकली. तिला शिक्षिका व्हायचे होते पण तिच्या सौंदर्याचे व नृत्य कलेचे भांडवल करून कोंडिबाने कोल्हाटी परंपरेचा तमाशाचा धंदा करणे भाग पाडले.

करमाळ्याचे आमदार नागदेवराव जगतापानी शांताबाईचा चिरा उतरला. त्यांच्याकडून कोंडिबास मुबलक पैसा मिळू लागला. आमदारानी शांताबाईस स्वत:कडे ठेवावे म्हणून कोंडिबास सांगितले पण कोंडिबाने स्वार्थासाठी ते नाकारले. शांताबाईस आमदारापासून मुलगा झाला पण आमदारानी कायमचे संबंध तोडून टाकले. तो मुलगा म्हणजे 'किशोर'. त्यानंतर शांताबाईस धारूरकरापासून झालेल्या मुलाचे नाव 'दीपक' असे ठेवले. धारूरकर अतिमद्यपानामुळे मरण पावल्यानंतर शांताबाईस कृष्णराव (नाना) वडकर यांनी आपल्या घरी ठेवले. परंतु 'किशोर' ला किशोर शांताबाई काळे असे नाव लावले गेले. तर दीपकला दीपक कोंडिबा काळे हे नाव लावले गेले.

किशोर काळे जिजीजवळ राहून मोठा झाला. बालपणापासून त्याला शिक्षणाची ओढ होती. अंगची हुशारी, कष्टाळूपणा, जिद्द आणि आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा आदर्श या बळावर किशोर एम.बी.बी.एस. झाला. आपली आई, आजी, मावश्या वगैरे कोल्हाटी स्त्रीजीवनाचे भोग त्यांनी त्यांच्यात जगून अनुभवले. आपल्या आत्मकथनामध्ये या जीवनाचे भेदक चित्रण त्यांनी केले आहे.

## २) <u>'कोल्हाट्याचं पोर' आत्मकथनाचा परिचय :-</u>

ग्रंथाली प्रकाशनाने १९९४ मध्ये 'कोल्हाट्याचं पोर' हे किशोर शांताबाई काळे यांचे आत्मकथन प्रसिद्ध केले. लेखकाच्या नावापुढे बापाच्या नावाऐवजी आईचे नाव लावण्याची अनिवार्यता लेखकाला वास्तवाच्या अटळतेने आली. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या पुरस्काराबरोबर अनेक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झालेल्या या आत्मकथनाच्या २००८ पर्यंत १७ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. भटक्या बहिष्कृत जातीत जन्मलेल्या किशोर काळे यांच्या आत्मकथनाने साहित्य जगतात लक्षणीय ठसा उमटविला.

जन्मत:च 'नाजायज औलाद' म्हणून समाजाकडून तिरस्करणीय पदवी घेऊन जगणे या लेखकाच्या नशिबी आले. आई-शांताबाई काळे तिचा चिरा उतरविणारे व किशोर जन्माला घालणारे आमदार नामदेवराव जगताप हे वडील. किशोर त्याचा भाऊ दीपक आणि आई शांताबाई एकच रक्ताची असून कागदोपत्री त्यांची नावे वेगवेगळी. कोल्हाटी समाजात स्त्रीच्या नाचगाण्याच्या कलेवर - 'तमाशा'च्या कलेवर मिळणाऱ्या पैशावर किंवा त्या कलेकडे आकर्षित होऊन कलावंतणीच्या

स्त्रीत्वावर भुलणाऱ्या श्रीमंत प्रतिष्ठिताच्या पैशावर आपला उदरनिर्वाह, व्यसने व ऐशआराम करणारा पुरूषवर्ग असतो. कोल्हाटी व प्रस्थापित समाजातील पुरूषीवर्गाच्या अन्यायी-स्वार्थी व्यवहारात शोषित म्हणून बळी जाणाऱ्या स्त्रीच्या पोटी जन्मणाऱ्या मुला-मुलींचे जीवन विक्रीच्या जनावरासारखे यातनामय-उपेक्षित व फरफटत जाणारे असते याचे वास्तव व भेदक दर्शन 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनात होते.

बलुतेदार-आलुतेदार प्रस्थापित गावगाड्याला जोडलेला पण गावकुसाबाहेर जगणारा समाज असतो. कोल्हाटी हा भटका-विमुक्त अनुसुचित जमातीत गणली जाणारी जात असे. कुटुंबप्रमुख किंवा कुटुंबाचा कर्ता म्हणून कष्ट करून कमाउणारा व आपला प्रपंच सांभाळणारा पुरूष या जातीत अभिप्रेत नसतो. स्त्रीने नाचगाणे करावे, दारू गाळावी किंवा भीक मागावी आणि कुटुंबातील पुरूषासहित मुलाबाळांचा प्रपंच चालवावा ही रीत आहे. पुरूष भीक मागण्याचेही कष्ट प्रसंग आला तरी घेत नाहीत. स्त्रियांनी कष्ट करून देह झिजवावा किंवा देह विकून पैसा मिळवावा पण जे काही करावे ते स्त्रीनेच अशी या कोल्हाटी जमातीची रीत आहे. अशा जातीत बापाचा आधार नाही व आईची सोबत नाही अशा पोरकेपणात परिस्थितीशी झुंज देत किशोर काळे एम.बी.बी.एस. पर्यंत शिक्षण घेऊन डॉक्टर होतात.

''पुस्तक लिहिण्याचा हेतू हाच की, आमच्या समाजाला जाग यावी !'' असे लेखक म्हणतो. आपल्या समाजातील स्त्रिया नाचगाणे करतात त्यांच्या या केलो रात्रभर नाचून दोनशे रूपये मिळतात. त्या नाचनारणीला इज्जतही नसते. मात्र सिनेमामध्ये उघड्या शरीराचे प्रदर्शन करणाऱ्या स्त्रिया लाखो रूपये मिळवतात. त्यांना प्रसिद्धीही-मानही मिळतो. ही तफावत लेखकाला बेचैन करते. कारण कोल्हाटी समाजातील स्त्रीशी लग्न करून कोणी राहिले तर ती निष्ठेने संसार करते अशी उदाहरणे आहेत पण असे अपवादाने घडते. सातत्याने कोल्हाटी स्त्रीकडे उपभोग्य म्हणून पाहिले जाते. तिच्या कलेकडे केवळ मनोरंजन म्हणून पाहिले जाते. कोल्हाटी स्त्रीची माणूस म्हणून व तिच्या नाचगाण्याची कला म्हणून कदर केली जात नाही, हे लेखकाचे दुःख आहे.

किशोर काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा'' या मंत्राला अनुसरले. अनेक अडचणी-संकटे झेलून शिक्षण

घेतले. त्याच्या नाजायजपणाने त्याचा सतत पाठलाग केला. या जीवघेण्या संघर्षाचे एक फळ म्हणून लेखक डॉक्टर झाला पण त्याचा महत्त्वाचा संघर्ष व महत्त्वाचा ध्येयप्रवास त्याच्या कोल्हाटी समाजासाठी विशेषतः त्यांच्यातील स्त्रियांसाठी त्यांनी सुरू केला. त्यातील एक टप्पा म्हणून प्रस्तुत आत्मकथनाची निर्मिती आहे. या लेखनाची प्रेरणा त्यांना शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या' वाचल्यामुळे मिळाली. आपले सर्व दु:ख त्यांनी प्रा. रवींद्र ननवरे यांना सांगितले तेव्हा त्यांनीही ते दु:ख पुस्तकाद्वारे प्रसिद्ध करण्यास सुचविले. दलित लेखकांचा मित्र परिवार व प्रकाशक यांच्या सहकार्यातून प्रस्तुत आत्मकथन साकार झाले.

'कोल्हाट्याचं पोर' मध्ये आलेल्या जीवनचित्रणात अधिक प्रमाणात कोल्हाटी स्त्रीजीवनाचे विदारक व भेदक दर्शन आहे. जातपंचायतीचा न्यायनिवाडा, पुरूषवर्गाची व्यसनाधीनता व गुन्हेगारी रूढी-श्रद्धा-अंधश्रद्धात स्त्रीचा चिरा उतरविणे, मुलांची (मुंज) दाडी लावणे, नवस, उपास तापास, अंगात येणे, भूतबाधा होणे, त्यावरील अघोरी उपाय याचे उद्विग्नता आणणारे वास्तवदर्शन येते. पुरूषवर्गाचे दारू पिणे, जुगार खेळणे, भडवेगिरी करणे असे भेकड हिडीस दर्शन होते. प्रवाहपतीत झालेल्या व फरफटत जाणाऱ्या या समाजाच्या माणूसपणाच्या वाताहतीकडे गांभिर्याने कोणी पहात नाही. स्वत:पुरताही माणूस म्हणून सुसंस्कृत विचार त्यांना सुचत नाही हे वास्तव किती भयानक आहे याचे चित्रण आपल्या जीवनकथेच्या प्रवासातूनच किशोर काळेंनी अत्यंत वेधक केलेले आहे. लेखकाच्या लेखणीमागील कळवळा अवघ्या कोल्हाटी समाजाविषयीचा आहे.

'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मकथन म्हणजे मन मारून जगणाऱ्यांचे विश्व आहे.[५] महाराष्ट्र देश विविध लोककलांनी नटलेला देश आहे. यापैकी 'तमाशा' ही शृंगार आणि बिभत्स या रसाने नटलेली लोकप्रिय कला असल्याने तिला लोकाश्रय मिळालेला आहे. विशेषतः उत्तर पेशवाईच्या काळात पानिपतच्या लढाईनंतर 'तमाशा' हा कलाप्रकार मोठ्या प्रमाणात रूढ आणि लोकप्रिय झालेला दिसतो. मात्र या कलेला स्वातंत्र्यानंतरच्या काळात लोकनाट्य या नावाने प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न शाहिर आण्णाभाऊ साठे यांनी केला. एकेकाळी राजाश्रय व लोकाश्रय असणारी कला मोठ्या प्रमाणात चालत होती. याच लोकाश्रयावर


16591

जगणारा समाज म्हणजे कोल्हाटी समाज होय. खरे म्हणजे वर्णव्यवस्थेतील जातपात गुंडाळून ठेवणारा, पारंपारिक वैवाहिक पद्धतीला नाकारणारा समाज आहे. पण स्त्री म्हणजे या समाजात जणू घरात पैसे आणण्याची मशीन मानली जाते. ती मशीन जसजशी जुनी निकामी होत जाईल तसे तिची किंमत कमी होऊन शेवटी तिला कुत्र्यापेक्षाही वाईट अवस्थेत जगावे लागते. तर खुद्द लेखकाची व्यथा ही तर सगळ्यांपेक्षा वेगळी आहे. या आत्मकथनाबरोबर लिहिलेल्या मनोगतात लेखक म्हणतात. ही कथा आहे समाजाने नाकारलेल्या आईवडिलांच्या प्रेमापासून वंचित राहिल्याने गरिबीने लाचार झालेल्या कोल्हाटी समाजात एका नाचणारणींच्या पोटी जन्म घेऊन डॉक्टरी शिकलेल्या पोराची. जन्मतःच मला नाजायज औलाद हे सर्टिफिकेट समाजानं दिलं आहे.[६]

'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनातून जाणवते की, सूतपुत्र म्हणजे कर्ण, शूर, दानशूर, उदार होता. परंतु त्यास हयातभर लांच्छनास्पद जगणे व अपमान वाट्याला आले. त्याप्रमाणे किशोर काळे यांची व्यथा ही जातीची व्यथा आहे. समाजात पत्नी म्हणून जगणाऱ्या स्त्रीला स्थान असते. ती मानाने, आदराने जगू शकते पण रखेलीला कोणत्याही प्रकारचा मान नाही, असे का ? याचे उत्तर या समाजाने मान्य केलेल्या कायद्याने विवाहित स्त्रीला नवऱ्याच्या प्रॉपर्टीचा मालकी हक्क मिळतो. मात्र रखेलीला कोणताही अधिकार नसतो. रखेलीचा कंटाळा आला की तिची किंमत शून्य होते. स्त्री ही एक भोग्य वस्तू म्हणून जवळ बाळगली जाते. तिच्या जीवनाची कोणतीच निश्चितता नसलेलं जिणं तिला जगणं भाग पडते आणि हे सर्व तिचे तारूण्य व शरीराच्या सौंदर्यावर अवलंबलेले असते. पुरूषाला तिचा कंटाळा आला तर तो तिचा कधीही अव्हेर करू शकतो.

किशोर काळेंची आई शांताबाई हिच्या वाट्याला जसे 'ठेवलेली बाई' म्हणूनच दुःख झाले त्याप्रमाणे एक नाचणारीण बाई म्हणून देखील आयुष्य जगण्याचे दुःख आले. नाचणारीण नजरेसमोर आली तर जळत्या मेणबत्तीची आठवण यायला उशीर होत नाही. कारणही तसेच आहे. ज्याप्रमाणे मेणबत्ती स्वतः जळून दुसऱ्यांचे जीवन प्रकाशमान करते त्याप्रमाणे छंदी-फंदी, पैसेवाला रंगेल समाज तिचे नाचणे पाहून आनंद मिळवतो. तिचे नातेवाईक किंवा आप्तेष्ट तिचे नाच गाणी व तिच्या देह प्रदर्शनातून कमावलेल्या पैशावर रिकामे बसून ऐश करतो, मौज उडवतो.

समाज तिला कुलटा समजतो. तारूण्य दुसऱ्यांसाठी वेचलेल्या या समाजातील स्त्रीला वृद्धापकाळी कुणीही आधार देत नाही. तिचे म्हातारपणात कोणीही पालनपोषण करत नाही.

'कोल्हाट्याचं पोर' चे लेखक किशोर काळे स्वत:चे दु:ख सांगताना म्हणतात - ''मी, माझी आई आणि माझा भाऊ रक्ताने एक आहोत. परंतु कागदोपत्री मात्र आम्हाला वेगळे केले आहे. शाळेत माझे नाव किशोर शांताबाई काळे असे असण्याचे कारण बापाचा पत्ता नाही. आईचे नाव शांताबाई कृष्णराव वडकर हे होते. कारण कोल्हाट्याची शांताबाई आता कृष्णराव वडकर (नाना) यांची पत्नी झाली आहे आणि माझा लहान भाऊ दिपक कोंडीबा काळे. कोंडीबा हे माझ्या आजोबाचं नाव होते. दिपकचे हे नाव नानानीच शाळेत टाकले होते. कारण पुढे चालून त्याने आपला वारस हक्कदार होऊ नये म्हणून ! कोंडीबा काळे हे आईचे वडील पण आजोबालाच दिपकचा बाप केला होता. हृदयाचे तीन तुकडे करावेत तसे आम्हाला तिघांना वेगळे करण्यात आले.''[७]

'कोल्हाट्याचं पोर' हे किशोर शांताबाई काळे यांचे आत्मकथन. कोल्हाटी समाज हा एक कलावंताचा समाज आहे. नाचणारी बाई म्हणजे नर्तिकाच होय. आपल्या कलेचे दर्शन घडवित आयुष्य झिजवणाऱ्या स्त्रियांचे जग म्हणजे कोल्हाट्याचं जग. पुरूषाने आपल्या आया-बहिणींच्या जीवावर हौस-मौज करीत जगायचे आणि त्यांनी नाचगाणे करायचे अशी प्रथा होती. लग्नाची प्रथा नाही. चिरा उतरविणे या प्रकारातून लाभलेला पुरूष तोच तिचा नवरा. ती त्याच्या मालकीची वस्तू. त्याला वाटेल तेव्हा आणि वाटेल तशी वापरता येणारी असे म्हटले तर चालेल. असे असून आईशिवाय वाढलेल्या किशोर काळेला आईच्या प्रेमाची जबरदस्त भूक आहे. 'कोल्हाट्याचं पोर'मध्ये आई आणि मुलगा यांच्या दोघांच्याही हृदयविदारक जगण्याचा अनुभव येतो. एका आगळ्यावेगळ्या समाजाचे दर्शन घडवणाऱ्या या आत्मकथनात किशोर आणि त्याची आई यांची झालेली कुत्तरओढ आहे. जिजीसारख्या स्त्रीचा शेवट हाही मनाला पिळ पाडणारा वाटतो.

स्वत: लेखकाची आई शांताबाई या शिकून शिक्षिका होणार होत्या परंतु नियतीनं घाला घालावा तसा त्यांच्या आजोबांनी तिचा घात केला. तिचे लग्न ठरवले. ठरवलेल्या मुलाबरोबर ते आपल्या दुसऱ्या मुलीचे लग्न लावतात आणि

शांताबाईंना नाचण्यासाठी फडात पाठवतात. खऱ्या अर्थानं शांताबाईंच्या जीवनाला वेगळा अर्थ निर्माण झाला. तसेच शांताबाईचा चिरा करमाळ्याचे आमदार नामदेवराव जगताप यांनी उतरवला होता. त्यांच्यापासून शांताबाईला दिवसही गेले. आमदार तिला करमाळ्याला ठेवू इच्छित होते; पण शांताबाईचा बाप कोंडीबाने नका दिला. हळूहळू आमदारांचे शांताबाईंकडे येणे बंद झाले. म्हणून कोंडीबाने मुलीचा म्हणजे शांताबाईचा गर्भपात घडवून आणण्याचे प्रयत्न केले. परंतु ते शक्य न झाल्याने शांताबाईच्या पोटात गर्भ वाढला. त्यातूनच लेखक किशोर काळे यांचा जन्म झाला.

परंतु जन्मल्यापासून त्यांच्या जीवनाची परवड सुरू झाली. रात्रभर नाचगाणं आणि दिवसा झोप, माणसांची गर्दी यामुळे तान्ह्या अवस्थेतल्या किशोरला शांताबाई नीटपणे आपले दूधसुद्धा पाजू शकत नव्हती. त्यानंतर ती सोनपेठला नानासोबत राहू लागल्यावर लहान वयात आईजवळ नसल्याने तिच्या भेटीसाठी, मायेसाठी किशोरचे बालमन तळमळले.

तसेच कोल्हाटी समाजात मुलांच्या मुंजी लावण्याची पद्धत आहे. त्याला ते दाडी लावणे म्हणतात. मामाच्या लग्नातच लेखक आणि त्याच्या नात्यातल्या त्याच्या वयाच्या काही मुलांची मुंज लावण्याचा कार्यक्रम होता नि कार्यक्रमासाठी लेखकाची आई शांताबाई सोनपेठ या कृष्णराव वाडकरांच्या (नानांच्या) गावाहून येणार असते. आई येणार म्हणून लहानगा किशोर आतुरतेने वाट पाहतो. परंतु आलेल्या गाडीतून आईसारखीच दिसणारी लेखकाची चुलत मावशी 'बदाम मावशी' आली होती. त्यामुळे डोळे पाण्याने भरलेला किशोर हुंदके देऊ लागतो. अशा अनेक प्रसंगातून लहान वयात लेखकाची घुसमट झालेली दिसते.

तसेच शांताबाईला तमाशात नाचायचे नव्हते तर शिक्षिका व्हायचे होते. पण कोंडिबाने सक्तीने तिच्या पायात घुंगरू बांधले व नाचायला लावले. संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या जीवनात कृष्णराव वडकर आले. त्यांनी तिला त्यांच्याबरोबर नेले. त्यांच्यासाठी शांताबाईला कितीतरी त्याग करावा लागला. सोसावे लागले. परंतु तिला सोशिकतेचे जगणेच नशिबी आले. तिच्या स्वभावाचा विशेष की, ती वडकरांना पती मानूनच राहिली. परंतु अशी एक शांताबाई नव्हे तर या समाजातल्या नाचण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर स्त्रियांचीही अवस्था फारशी चांगली नसते.

तिला ना स्वत:च्या मुलांचा आधार असतो ना बापाचा. किशोर काळे या गर्तेतून मोठ्या जिद्दीने बाहेर पडले. पण कोल्हाट्याचा मुलगा म्हणून त्यांच्या वाट्याला टिंगलटवाळी आणि अपमान आले. त्या साऱ्या दिव्यातून जात असताना जी मनाची कुचंबणा झाली, हाल झाले ते विसरणे कठीण आहे. त्यांना नैराश्याने पुरते ग्रासून टाकले. तेव्हा त्यांनी आत्महत्या करण्यासाठी प्रयत्न केला. परंतु नशीब चांगले म्हणून वाचले. नागीण मावशी, लोणीकर काका यांच्या मदतीने ते पुन्हा जोमाने उभे राहिले आणि डॉक्टर झाले.

अशाप्रकारे कोल्हाटी समाजात जन्माला आलेल्या किशोर काळे यांच्याबरोब समाज आणि जन्मदात्री शांताबाई काळे यांच्या जीवनाची लक्तरे वेशीवर टांगलेली दिसतात. त्यांच्या पाठीमागे लोकांनी 'तमाशा' या लोककला प्रकाराला दिलेली बगल होय. 'अक्करमाशी' चे शरण कुमार लिंबाळे व 'कोल्हाट्याचं पोर' चे किशोर काळे या लेखकांना जातीयतेच्या विळख्यात जखडून समाजाने त्यांच्या माणूसपणाची क्रूर थट्टा केली आहे.

तरीदेखील स्वत:चा स्वार्थ न बघता आपल्या अवघ्या समाजासाठी काळे व लिंबाळे या दोघांनाही येणाऱ्या सर्व समस्यांना तोंड देत आपले नि आपल्या समाज बांधवांच्या दु:खाला वाचा फोडलेली दिसते. अवघ्या समाजाची जाणीवजागृती व्हावी यासाठीच ही आत्मकथने लिहिली गेली.

'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मकथन किशोर काळे यांचे आहे तितकेच त्यात त्यांच्या आईच्या आयुष्याचे व समाजातील उच्चवर्णीयाने केलेल्या दुर्विलासाचे चरित्र सामावले आहे. आपले स्वप्न भंगल्यानंतर मुलाच्या आयुष्याचे सुंदर स्वप्न वास्तवात उतरविण्यासाठी आपले चरित्र, आपले स्त्रीत्व, आपले माणूसपण, आपले स्वास्थ्य-सुख-आराम पणाला लावणाऱ्या मातृत्वाचे चरित्र या आत्मकथनात विखुरलेले आहे. केवळ जन्मावरून माणसाला प्रतिष्ठा-अप्रतिष्ठा देणाऱ्या समाजव्यवस्थेत बलवत्तराकडून दुर्बल स्त्रीवर लादले जाणारे मातृत्व म्हणजे माणुसकीचे हत्यारे राजरोस प्रतिष्ठित म्हणून मिरवतात. दुर्बलांना मात्र 'माणूस' म्हणून जगण्यासाठी रोज मरण भोगावे लागते.

प्रतिष्ठित म्हणविल्या जाणाऱ्या माणसांच्या अमानुषवृत्तीचा परदाफाश अशा आत्मकथनातून होतोच पण त्याबरोबर ज्यांनी आपले माणूसपण सिद्ध करण्यासाठी

मरणसंघर्ष केला त्यांचे उच्चतर सद्‌गुण पैलूदारपणे अशा आत्मकथनातून लक्ष वेधून घेतात. मानवता हाच धर्म मानल्या जाणाऱ्या साहित्य क्षेत्रात अशा उच्चतर मानवी मूलयांनी ज्यांचे व्यक्तित्व भारलेले असते, ज्यांची उक्ती-वृत्ती-कृतीत भिन्नत्व नसते अशांचे चरित्र, आत्मचरित्र आणि त्याहून आत्मकथन म्हणजे दीपस्तंभ होत. अमानुषतेच्या अंध:कारातून वाटचाल करणाऱ्या ध्येयवादी व्यक्तींना अशा साहित्यकृती मार्गदर्शक ठरतात.

मनातले साठवलेले दु:ख मांडत असताना आत्मकथनकाराच्या एक व्यक्ती म्हणून असणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचे, भाव-भावनांचे, विकारवासनांचे दर्शन होणे म्हणजे त्यांच्या प्रामाणिकपणाचे लक्षण आहे. दया पवारांच्या एका कवितेचा संदर्भ देऊन बलुतंमधील दगडू पवार म्हणतो, ''महारवाड्यातील माणसं तशी जनावरासारखी जगत होती. त्यांच्या जीवनातही एक रंगेल तत्त्वज्ञान होते. मात्र त्यांची घृणा वाटत चाललेली आणि ज्यांचं जीवन मला आदर्श वाटत होते ते मात्र मला सामावून घेण्यास राजी नव्हते. अशा चमत्कारिक कोंडीत मी सापडलो होतो.''

अशाच जातियतेच्या विळख्यात अडकलेल्या आणि जीव मारून जगणाऱ्यांमध्ये शरणकुमार लिंबाळे, किशोर काळे हे आत्मकथनकार देखील समाविष्ट होतात.

अक्करमाशीतील दु:खाचे स्वरूप लक्षात घेतल्यास लेखकाने हे आत्मकथन स्वत:ला केंद्रस्थानी ठेवून लिहिले आहे. या लेखनामागे जशी त्यांच्या जीवाची होणारी काहिली, तगमग आहे तसे जन्म, जात, अनौरसपण यांच्या विषयीचे सखोल चिंतनही आहे. आपल्या दु:खाला कारणीभूत असणाऱ्या सर्व घटकांचा त्यांनी सखोल अभ्यास केला आहे.

तसेच अक्करमाशीमध्ये लेखकाचा रोखठोकपणा व पराकोटीची स्पष्टता दिसते, कोणत्याही प्रकारचा आडपडदा ठेवलेला नाही. जणू त्यांनी स्वत:ला सोलून जगासमोर उभे केले आहे. अक्करमाशीचे लेखक शरणकुमार लिंबाळे म्हणजे ''गाव, भाषा, आई-वडील, जात, धर्म या सर्वच बाबतीत दुभंगलेले व्यक्तिमत्तव होय.''

तर मग मन मारून जगणाऱ्यांचे विश्व म्हणजे ''कोल्हाट्याचं पोर'' ओळखलं जाणारे किशोर शांताबाई काळे यांचे आत्मकथन होय.

मनोरंजनाला सरावलेल्या बिनधास्त समाजाला कोल्हाटी समजले जायचे अशाच कुटुंबात शांता नावाच्या कलावंतीणीच्या पोटी सवर्ण प्रतिष्ठित आमदारापासून जन्मास आलेल्या दुर्दैवी मुलाची व्यथा म्हणजे 'कोल्हाट्याचं पोर' होय.

कोल्हाटी समाजाच्या मानापमानाच्या प्रतिष्ठेच्या कल्पना म्हणजे जगण्याचे, तडजोडीचे गणित होय. ते आर्थिक स्थैर्याशी निगडीत आहे. अशा व्यवस्थेत रखेली म्हणून जगणाऱ्या स्त्रीला प्रतिष्ठा नाकारण्यातही अर्थशास्त्रच आहे. माणसाला नुसतेच पोटासाठी जगणे नको असते. सर्व सुख असूनही तो अशांत अस्वस्थ आणि दु:खी असू शकतो. कारण त्याची 'प्रतिष्ठा' समाजातील एक व्यक्ती म्हणून हवे असलेले परंतु मिळत नसलेले 'स्थान' होय.

किशोर काळेंची आई शांताबाई हिच्या वाट्याला जसे 'रखेली' (ठेवलेली बाई) म्हणूनच दु:ख आले. शांताबाईला तमाशात नाचायचे नव्हते. शिकून शिक्षिका व्हायचे होते. पण कोंडिबाने सक्तीने तिच्या पायात घुंगरू बांधले, नाचायला लावले. संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या शांताबाईच्या जीवनात कृष्णराव वडकर आले. त्यांनी तिला आपल्याकडे नेले. त्यांच्यासाठी शांताबाईला कितीतरी त्याग करावा लागला. सोसावे लागले. परंतु छळ सोसतच जगणे नशिबी आले. तिच्या स्वभावाचा विशेष की, ती वडकरांना पती मानूनच राहिली. तिच्यातले साध्वीपण कोणत्याही स्त्रीपेक्षा कमी नाही. कोल्हाटी समाजातील प्रातिनिधिक स्त्रीजीवन म्हणून शांताबाईच्या जीवनाकडे पाहता येते. अशी एक शांताबाई नव्हे तर या समाजातल्या नाचण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर स्त्रियांचीही अवस्था फारशी वेगळी नाही. तिला ना स्वत:च्या मुलांचा आधार असतो ना बापाचा. आई-बापाच्या संसारासाठी तिला आपले तान्हे मूलही आई-बापाजवळ सोडून गावोगाव नाचायला जावे लागते. कारण मूल असलेल्या स्त्रीला किंमत मिळत नाही. आपले मन मारून तिला हे कृत्य करावे लागते. अशा समाजात जन्मलेल्या मुलांचे हाल होतात. त्यांच्यावर झालेल्या संस्काराच्या अभावाने तेच आपल्या बहिणींना नाचायला लावतात आणि त्यांच्या जीवावर जगू लागतात.

किशोर काळे या गर्तेतून मोठ्या जिद्दीने बाहेर पडले. पण कोल्हाट्याचा मुलगा म्हणून त्याच्या वाट्याला टिंगलटवाळी आणि अपमान आले. त्या साऱ्या

दिव्यातून जाताना त्यांची कुचंबना झाली. 'कोल्हाट्याचं पोर' चे नायक शेवटी आईच्या नावानेच जीवन प्रवासास गेले.

अशाप्रकारे दोन्ही आत्मकथने मानवी हृदयाला पीळ पाडतील अशा वास्तवाचे चित्रण आहे.

**निष्कर्ष -**

१) दलित आत्मकथन लिहिणारे सर्वच लेखक अस्पृश्यतेचा अंत करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने व शिक्षणाने जागृत झालेले दिसतात.

२) लेखक शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म आईवडिलांच्या लग्नबाह्य व्यभिचार व जातीभिन्नतेतून झालेला असल्याने समाजाने त्यांना नाकारले व आयुष्यभर 'अक्करमाशी' नावाने संबोधले.

३) आत्मकथन लिहिणारे लेखक ३०-३५ या वयोगटातील असतात. लेखकाच्या विलक्षण जीवनाची प्रभावी पण वास्तव हकिकत अशा आत्मकथनातून येते.

४) वर्षानुवर्षे दडपलेल्या सामाजिक अन्यायाची प्रतिक्रिया म्हणून भावनांचा उद्रेक 'अक्करमाशी' तून आलेला आहे.

५) 'अक्करमाशी' म्हणजे सवर्ण बाप व अस्पृश्य आई यांच्या अनैतिक मानलेल्या संकरातून जन्मलेल्या मुलाच्या आयुष्याचा विदारक आणि न संपलेल्या प्रवासाची हकिकत होय.

६) लेखक व त्याच्या आप्तेष्टांची जन्मापासूनच मिळालेल्या माणूसपणाची उपेक्षा होताना दिसते.

७) 'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मकथन म्हणजे 'मन मारून जगणाऱ्यांचे विश्व' आहे. तसेच ते शृंगार आणि बिभत्स या रसाने नटलेले लोकप्रिय कलादर्शन घडविणारे आत्मकथन आहे.

८) 'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मकथन तमाशा कलावंत स्त्रीच्या व सवर्ण प्रतिष्ठिताच्या अनैतिक मानल्या जाणाऱ्या संबंधातून जन्माला आलेल्या संवेदनशील, समजूतदार, कष्टाळू, सोशिक तरूणाच्या वास्तव जीवनाचा विदारक पट उलगटणारे चित्रण आहे.

९) स्वतःच्या कलेचे प्रदर्शन करून कुटुंब जगवणाऱ्या व लोकांच्या मनोरंजनासाठी मन मारून जगणाऱ्या कलावंतीणीला समाज कुलटा म्हणून संबोधतो.

१०) कोल्हाटी समाजातील सुंदर स्त्रियांना लग्न करून मानाने जगण्याचा अधिकार न देता कुटुंब प्रमुख स्वतःच्या ऐशआरामासाठी दुसऱ्यांना उपभोग्य वस्तू म्हणून विकतात.

११) सवर्ण समाजातील बलवत्तर पुरूष अस्पृश्य स्त्रीला भोगवस्तू म्हणून वापरतात. तरीही ते प्रतिष्ठितच मानले जातात. मात्र अशी स्त्री माणूस म्हणून जगते आणि माणूस म्हणून जगण्यासाठी रोज मरण पत्करते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## संदर्भसूची

१) वासुदेव मुलाटे - दलित साहित्याची संकल्पना व स्वरूप, स्वरूप प्रकाशन, १४ जानेवारी १९९९, औरंगाबाद, पृ.क्र. ४३.

२) शरणकुमार लिंबाळे - अक्करमाशी, दिलीपराज प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती २००८, पृ.क्र. ४१.

३) शरणकुमार लिंबाळे - दुभंगलेल्या मनाची कहाणी 'अक्करमाशी', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.क्र. १६.

४) तत्रैव, पृ.क्र. ७५.

५) वासुदेव मुलाटे-दलित साहित्याची संकल्पना व स्वरूप, उ.नि., पृ.क्र. ९४.

६) किशोर शांताबाई काळे - कोल्हाट्याचं पोर (मनोगत), ग्रंथाली, दादर, मुंबई, प्रथमावृत्ती १९९४ - १४ वे पुनर्मुद्रण २००८.

७) तत्रैव, पृ.क्र. २७.